MHRG070003172026

<u>**फौजदारी चौकशी अर्ज क्र.४३/२०२६ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश**</u>

सदर अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ५०३ अन्वये अर्जदार श्री. प्रकाश मंगल कराळे, राहणार – बेकरे, ता. कर्जत ,जि. रायगड, येथील दाखल गुन्हा नोंद क्र.३०/२०२६ मधील वॅंगनार गाडी ही जप्त चारचाकी गाडी नोंदणी क्रं. MH-05BS4155 व चेसीस क्रं. MA3EWDE15005871365 चा ताबा मिळणेसाठी केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, सदरचे वाहन श्री. कारभारी शंकर गोडसे यांच्याकडून वाहनबध्द कराराने प्रकाश मंगळ कराळे यांनी विकत घेतलेले आहे. सदरच्या वाहनाची नोंदणी प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे सदरचे वाहन अदयाप मूळ मालक यांच्या नावावर आहे. फॉर्म नं.२८ सदर अर्जासोबत जोडलेला आहे. सदरील चारचाकी वाहनाचा या गुन्हयाशी काहीही संबंध नाही. सदरचे चारचाकी वाहन हे अर्जदाराच्या एकट्याच्या मालकीचे आहे. सदरचे चारचाकी वाहन नेरळ पोलीस स्टेशनच्या आवारात उन्हात उभे असून ते वाहन व्यवस्थित ठेवण्याची कोणतीही यंत्रणा पनवेल पोलीसांकडे नाही. सदरील चारचाकी वाहन हे अर्जदाराच्या नित्याच्या वापराचे असल्याने त्याचा ताबा अर्जदाराकडे असणे आवश्यक आहे. सदरील वाहन हे बंद अवस्थेत बराच काळ पडून राहिल्यास,त्याची बरीच नुकसानी होणार आहे. सदरील वाहनाच्या स्वरुपामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल न करण्याची हमी अर्जदार घेत आहे. सदरील वाहन मा. न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणासही कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत न करण्याची हमी

अर्जदार घेत आहे. चौकशीचे काम व संपरीक्षाचे कामी ज्या ज्या वेळेस सदरील वाहनाची गरज भासेल त्या त्या वेळेस ती हजर करण्याची हमी अर्जदार घेत आहे. आवश्यक त्या रकमेचा बॉण्ड देण्यास सदरील अर्जदार तयार आहे. सबब अर्जदार यांचे मालकीचे सदरील वाहन नेरळ पोलीस स्टेशन यांस परत देण्याचा हुकूम करण्यात यावा. इतर योग्य व न्यायाचे हुकूम अर्जदारांच्या लाभत व्हावेत.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता आणि तपासी अंमलदार यांचे म्हणणे मागविले. सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले आहे की, सदर प्रकरणामध्ये आरोपीचे विरुध्द गंभीर स्वरुपाचा दखलपात्र अजामीनपात्र गुन्हा आहे. सदर गाडीतून मुद्देमाल हा अवैध्दरीत्या विनापरवाना वाहन असल्याचे तपासात निष्पन्न आहे. सदर वाहन हे अर्जदारास परत केल्यास अश्याच प्रकारचे गुन्हे करणे कामी वापरण्याची शक्यता आहे किंवा त्यात फेरबदल अथवा विक्री करण्याची शक्यता आहे. सबब, सदर अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा ही विनंती. तपासी अंमलदार यांनी असे कथन केले आहे की,सदरचे चारचाकी वाहनाचा वापर अर्जदाराने अवैधरित्या हातभट्टीच्या गावठी दारुच्या वाहतूकीसाठी केला आहे. नमूद गाडी ही अर्जदार यांच्या नावे नसून ती मूळ गाडी मालक हे अद्याप पर्यंत तपासकामी पोलीस ठाणेत हजर झालेले नाहीत. त्यामुळे अर्जदार यांचे नावावर गाडीचे मालक असलेबाबत कायदेशीर पूर्तता झालेली असल्याचे दिसून येत नाही. अर्जदार यांनी कोणत्याही प्रकारे कायदेशीर पूर्तता करुन गाडी स्वतःचे नावावर करुन घेतली नाही. त्यामुळे सदरची गाडी यांचे ताब्यात दिल्यास तीच वापर तो गाडीमध्ये बदल करुन भविष्यात गंभीर स्वरुपाच्या गुन्हयात करणेची दाट शक्यता आहे किंवा मोठ्या प्रमाणात दारुची वाहतूक करण्याची शक्यता आहे व त्यातून विषारी दारु कांड होणेची दाट शक्यता आहे. जेव्हा

जेव्हा मा. न्यायालयास आवश्यक वाटल्यास तेव्हा तेव्हा अर्जदार हे गाडी मा. न्यायालयात हजर करणार नाहीत. तरी वरील नमूद कारणास्तव अर्जदार यांनी नमूद गाडी परत देवू नये, ही विनंती आहे.

०४. मी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी त्यांचे वाहनाचे वचनबध्द कराराची साक्षांकित प्रत, अर्जदार यांचे वाहनाचे आर. सी.बुक ची साक्षांकित प्रत, अर्जदार यांच्या आधारकार्डची साक्षांकित प्रत, प्रथम खबर अहवालाची साक्षांकित प्रत, फॉर्म नं.२८ ची सत्यप्रत इत्यादी सदरची कागदपत्रे पडताळुन पाहिली असता सदरचे वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सदरचे वाहन हे नेरळ पोलीस स्टेशन, यांचे कार्यालयात ठेवुन दिल्यास कोणताही उद्देश साध्य होणार नाही. सबब, सदर जप्त मुद्देमाल अर्जदारास परत देणे मला उचित वाटते. करिता निम्नलिखित आदेश.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | नेरळ पोलीस स्टेशन येथील दाखल गुन्हा नोंद क्र.३०/२०२६ मधील वॅगनार गाडी ही चारचाकी गाडी नोंदणी क्र. MH-05BS4155 चेसीस क्र.MA3EWDE15005871365 अर्जदार श्री.प्रकाश मंगल कराळे यांना रक्कम रुपये ३,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये तीन लाख) रुपयांच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अंतरिम स्वरुपात द्यावा. |
| ३. | जप्त चारचाकी गाडी ही अर्जदाराची नसल्याचे निष्पन्न झाल्यास सदर गाडीची किंमत अगर गाडी अर्जदार यांनी परत करावी. |
| ४. | अर्जदाराने चारचाकी गाडी ही निर्देशित तारखेस न्यायालयात हजर ठेवावा. तसेच चारचाकी गाडी ही गहाण, दान, विक्री, त्याचे स्वरुपात |

| | |
|---|---|
| | कोणताही बदल न करणे, कोणासही हस्तांतरण न करणे व नष्ट न करणे. |
| ५. | दुय्यम निरीक्षक यांनी अर्जदारास सदरची चारचाकी गाडी देण्यापुर्वी त्याचे छायाचित्र अर्जदाराच्या खर्चाने काढुन त्याचा सविस्तर पंचनामा तयार करावा व गुन्हयाच्या दोषारोपत्रात त्याचा समावेश करावा. |
| ६. | अर्जदाराने सदर चारचाकी गाडीचा वापर कोणत्याही अवैध कारणासाठी करु नये तसेच सदर चारचाकी गाडी अवैध कोणासही वापरण्यास देऊ नये. |
| ७. | सदर आदेशाची प्रत नेरळ पोलीस स्टेशन यांच्याकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. |

Sd/-

कर्जत

दिनांक : २३/०३/२०२६

(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.
जि. रायगड